संजय गांधी निराधार अनुदान योजना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८ करिता अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: संगांयो -२०१८/प्र.क्र. ५३/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १८ एप्रिल, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.मकोनी-१०१०/प्र.क्र.३२/कोषा-प्र.५, दि.१५ एप्रिल, २०१०.
३ शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८.
४. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीजीटी २०१८/प्र.क्र.५४/ अर्थसंकल्प, दिनांक १६ एप्रिल, २०१८.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता संजय गांधी निराधार अनुदान योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये ५६७,९०,३३,०००/- (रुपये पाचशे सदुसष्ठ कोटी नव्वद लक्ष तेहतीस हजार फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रकान्वये संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी एप्रिल, २०१८ ते डिसेंबर, २०१८ या कालावधीच्या खर्चासाठी एकूण तरतूदीच्या ७० टक्के म्हणजेच रुपये ३९७,५३,२३,१००/- (रुपये तीनशे सत्याण्णव कोटी त्रेपन्न लक्ष तेवीस हजार शंभर फक्त) वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी **एप्रिल, २०१८ ते डिसेंबर, २०१८** या कालावधी मध्ये पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयाना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. सदरचे अनुदान वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे. संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च "मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, १०४-वृध्द विकलांग व निराश्रीत व्यक्तींचे कल्याण (०८) (०९) संजय गांधी निराधार अनुदान योजना (कार्यक्रम) (२२३५ अे २९४) ५०-इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र.३ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी. तसेच त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असेही कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

६. हा शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२.०४.२०१८ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०४१८१७३५२१५६२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.04.18 17:38:40 +05'30'

(अ.कों. अहिरे)

अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
७) वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८) उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड नस्ती, विसयो.

STATEMENT

Accompinement of Government Resolution No.SGY-2018/C.R.53 / Visayo, Dated: 18 April, 2018.

Release of grant for the year 2018-19

Sanjay Gandhi Niradhar Anudan Yojana

Sr.n	District	New CO Code	Sanjay Gandhi Niradhar Anudan Yojana No. of Beneficiaries				Apr-18	May-18	Jun-18	Jul-18	Aug-18	Sep-18	Oct-18	Nov-18	Dec-18	Total Amount Released Vide this order (17=8+9+10+11+12+13+14+15+16)
			Rs.400/- P.M	Rs.600/- P.M	Rs.900/- P.M	Total										
1	2	3	4	5	6	7	8	9	10	11	12	13	14	15	16	17
1	Mumbai	N0028	0	1609	2324	**3933**	1748339	1748339	1748339	1748339	1748339	1748339	1748339	1748339	1748339	15735051
2	Mumbai Suburban	N0029	0	2733	1889	**4622**	2054620	2054620	2054620	2054620	2054620	2054620	2054620	2054620	2054620	18491580
3	Thane	N0036	115	7593	5215	**12923**	5744669	5744669	5744669	5744669	5744669	5744669	5744669	5744669	5744669	51702021
4	Raigad	N0012	1392	12628	353	**14373**	6389239	6389239	6389239	6389239	6389239	6389239	6389239	6389239	6389239	57503151
5	Ratnagiri	N0023	1348	7227	7175	**15750**	7001358	7001358	7001358	7001358	7001358	7001358	7001358	7001358	7001358	63012222
6	Sindhudurg	N0018	935	6042	3431	**10408**	4626675	4626675	4626675	4626675	4626675	4626675	4626675	4626675	4626675	41640075
7	Palghar	N0037	1123	7711	1390	**10224**	4544881	4544881	4544881	4544881	4544881	4544881	4544881	4544881	4544881	40903929
	Total Kokan		**4913**	**45543**	**21777**	**72233**	**32109781**	**32109781**	**32109781**	**32109781**	**32109781**	**32109781**	**32109781**	**32109781**	**32109781**	**288988029**
8	Nashik	N0006	3155	20664	599	**24418**	10854549	10854549	10854549	10854549	10854549	10854549	10854549	10854549	10854549	97690941
9	Dhule	N0026	2438	17279	469	**20186**	8973296	8973296	8973296	8973296	8973296	8973296	8973296	8973296	8973296	80759664
10	Jalgaon	N0010	10238	45154	327	**55719**	24768804	24768804	24768804	24768804	24768804	24768804	24768804	24768804	24768804	222919236
11	Ahmednagar	N0030	1475	33202	1748	**36425**	16192029	16192029	16192029	16192029	16192029	16192029	16192029	16192029	16192029	145728261
12	Nandurbar	N0027	3910	8277	126	**12313**	5473506	5473506	5473506	5473506	5473506	5473506	5473506	5473506	5473506	49261554
	Total Nashik		**21216**	**124576**	**3269**	**149061**	**66262184**	**66262184**	**66262184**	**66262184**	**66262184**	**66262184**	**66262184**	**66262184**	**66262184**	**596359656**
13	Pune	N0040	711	18732	12007	**31,450**	13980489	13980489	13980489	13980489	13980489	13980489	13980489	13980489	13980489	125824401
14	Solapur	N0019	1940	41364	6972	**50,276**	22349224	22349224	22349224	22349224	22349224	22349224	22349224	22349224	22349224	201143016
15	Satara	N0032	1216	22386	3459	**27,061**	12029444	12029444	12029444	12029444	12029444	12029444	12029444	12029444	12029444	108264996
16	Sangali	N0008	947	15363	10722	**27,032**	12016553	12016553	12016553	12016553	12016553	12016553	12016553	12016553	12016553	108148977
17	Kolhapur	N0039	1478	22236	13408	**37,122**	16501867	16501867	16501867	16501867	16501867	16501867	16501867	16501867	16501867	148516803
	Total Pune		**6292**	**120081**	**46568**	**1,72,941**	**76877577**	**76877577**	**76877577**	**76877577**	**76877577**	**76877577**	**76877577**	**76877577**	**76877577**	**691898193**
18	Nagpur	N0014	2355	54044	21092	**77,491**	34447126	34447126	34447126	34447126	34447126	34447126	34447126	34447126	34447126	310024134
19	Wardha	N0025	1254	16808	4146	**22208**	9872137	9872137	9872137	9872137	9872137	9872137	9872137	9872137	9872137	88849233
20	Chandrapur	N0021	4944	30512	4432	**39888**	17731439	17731439	17731439	17731439	17731439	17731439	17731439	17731439	17731439	159582951
21	Bhandara	N0033	3943	28112	2063	**34118**	15166497	15166497	15166497	15166497	15166497	15166497	15166497	15166497	15166497	136498473
22	Gadchiroli	N0013	2823	10299	6178	**19300**	8579441	8579441	8579441	8579441	8579441	8579441	8579441	8579441	8579441	77214969
23	Gondia	N0024	3454	20060	361	**23875**	10613169	10613169	10613169	10613169	10613169	10613169	10613169	10613169	10613169	95518521
	Total Nagpur		**18773**	**159835**	**38272**	**2,16,880**	**96409809**	**96409809**	**96409809**	**96409809**	**96409809**	**96409809**	**96409809**	**96409809**	**96409809**	**867688281**
24	Amaravati	N0011	2207	44945	7807	**54959**	24430961	24430961	24430961	24430961	24430961	24430961	24430961	24430961	24430961	219878649
25	Akola	N0041	797	23055	7307	**31159**	13851131	13851131	13851131	13851131	13851131	13851131	13851131	13851131	13851131	124660179
26	Yavatmal	N0007	1488	34751	556	**36795**	16356506	16356506	16356506	16356506	16356506	16356506	16356506	16356506	16356506	147208554
27	Buldhana	N0038	2316	36011	129	**38456**	17094871	17094871	17094871	17094871	17094871	17094871	17094871	17094871	17094871	153853839
28	Washim	N0022	449	20991	5114	**26554**	11804067	11804067	11804067	11804067	11804067	11804067	11804067	11804067	11804067	106236603
	Total Amaravati		**7257**	**159753**	**20913**	**187923**	**83537536**	**83537536**	**83537536**	**83537536**	**83537536**	**83537536**	**83537536**	**83537536**	**83537536**	**751837824**
29	Aurangabad	N0035	612	26038	33	**26683**	11861411	11861411	11861411	11861411	11861411	11861411	11861411	11861411	11861411	106752699
30	Beed	N0034	1047	39726	240	**41013**	18231536	18231536	18231536	18231536	18231536	18231536	18231536	18231536	18231536	164083824
31	Nanded	N0031	306	20585	467	**21358**	9494286	9494286	9494286	9494286	9494286	9494286	9494286	9494286	9494286	85448574
32	Parbhani	N0016	1039	16232	73	**17344**	7709939	7709939	7709939	7709939	7709939	7709939	7709939	7709939	7710080	69389592
33	Osmanabad	N0020	1349	20451	6139	**27939**	12419742	12419742	12419742	12419742	12419742	12419742	12419742	12419742	12419742	111777678
34	Jalana	N0015	1171	19730	78	**20979**	9325808	9325808	9325808	9325808	9325808	9325808	9325808	9325808	9325808	83932272
35	Latur	N0009	1357	19431	6001	**26789**	11908532	11908532	11908532	11908532	11908532	11908532	11908532	11908532	11908532	107176788
36	Hingoli	N0017	871	11521	103	**12495**	5554410	5554410	5554410	5554410	5554410	5554410	5554410	5554410	5554410	49989690
	Total Aurangabad		**7752**	**173714**	**13134**	**194600**	**86505664**	**86505664**	**86505664**	**86505664**	**86505664**	**86505664**	**86505664**	**86505664**	**86505805**	**778551117**
	Grand Total		**66203**	**783502**	**143933**	**993638**	**441702551**	**441702551**	**441702551**	**441702551**	**441702551**	**441702551**	**441702551**	**441702551**	**441702692**	**3975323100**